# सोनेरी पाने उलगडताना...

खो-खो खेळातील ४ वीर अभिमन्यू, ११ एकलव्य, १६ शिवछत्रपती, २ दादोजी कोंडदेव, १ अर्जुन व राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या खो-खो स्पर्धांत महाराष्ट्राच्या संघाला १६ कप्तान ज्याने दिले तो नव महाराष्ट्र संघ या वर्षी आपला सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहे.

नव महाराष्ट्र संघ (पुणे) म्हटले, की प्रत्येकाच्या मनात एक वेगळी आपलेपणाची भावना व वेगळा दबदबा आपोआपच निर्माण होतो. सुवर्ण महोत्सवानिमित्त या संघाने आपल्या परंपरेनुसार अखिल भारतीय निमंत्रित खो-खो स्पर्धेचे आयोजन केले आहे.

या संघाची स्थापना १० जून १९६८ रोजी झाले. त्या वेळी या संघाचे डॉ. वसंत साठ्ये अध्यक्ष होते; पण या संघाची मुहूर्तमेढ कै. पाटणकर सरांनी रोवली. सचिवपदाची धुरा डॉ. झंवर, कै. सतीश नातू, डॉ. सतीश देसाई, कै. सुनील तांबे यांनी सांभाळली. १९७८मध्ये मोडक सरांकडे अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली गेली. त्यांनी १० वर्षे काम केल्यानंतर ही जबाबदारी सुरेश दिनकर यांच्याकडे आली. दिनकर सर १५ वर्षे अध्यक्ष होते. आता ही सूत्रे २००३पासून अरविंद पटवर्धन यांच्यांकडे आहेत. संघाच्या कार्यालयीन कामकाजात बुद्धिमान कै. सुनील तांबे यांनी उत्तम घडी तर बसविलीच; शिवाय खो-खोच्या खेळाडूंना आर्थिक पाठबळ देण्यासाठी बँका, रेल्वे इत्यादी ठिकाणी नोकऱ्या मिळवून देण्यात मौलिक वाटा उचलला. त्यांच्या प्रयत्नांना त्या वेळी बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ इंडिया, सुवर्ण सहकारी बँक आदींनी साथ दिली. त्यानंतर

**राज्याला अनेक खो-खोपटू देणाऱ्या नव महाराष्ट्र संघाला ५० वर्षे झाली. संघाची स्थापना, त्यांची खेळासाठी चाललेली धडपड, त्याचे उपक्रम यांचा हा आढावा**

सचिवपदाची जबाबदारी अर्जुन पारितोषिकविजेते श्रीरंग इनामदार यांनी ३ तपांहून अधिक काळ उत्तमरीतीने सांभाळून स्पर्धा आयोजनात नावीन्य दर्शवीत विविध उपक्रम राबवून आपल्या संघात व्यवहारचातुर्याचा आदर्श अनेकांसमोर पेश केला.

अर्थात, त्यांना मोलाची साथ ज्येष्ठ व कनिष्ठ खेळाडू, सभासद यांची आहेच; पण अथक श्रम करणारे सचिन गोडबोले, अरुण बोडस, शिरीन गोडबोले आदींना दाद द्यायला हवी. हिशेबाची कामे तत्परतेने, वेळेवर पार पाडण्यात संघाचा हात कोणी धरू शकणार नाही; कारण तशी परंपराच निर्माण केली ती रमेश होनवाड, शरद वाघ, शिरीष पोळेकर आदींनी. आर्थिक व्यवहारातील पारदर्शकतेमुळे व स्वच्छ आणि सचोटीने व्यवहार करण्याची खात्री असल्यामुळे प्रत्येक स्पर्धा अधिकाधिक आश्रयदाते मिळवून वाढत्या दर्जाने पार पडल्यास नवल नाही. याचबरोबर, संघाला दर वेळी शिक्षण प्रसारक



मंडळीने सर्व प्रकारे मदत केली आहे. मंडळाशी संघाचे एक अतूट नातेच आहे.

भारतीय खेळांना वाहून घेतलेल्या या संघाने खो-खोच्या प्रचार आणि प्रसारासाठी गेल्या अर्धशतकात अनेक प्रकारचे उपक्रम होती घेतले आहेत.

शाळाशाळांत जाऊन खेळासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनी निवडणे, विविध स्तरांवर स्पर्धा आयोजित करणे, उत्तेजनार्थ रोख पारितोषिके आणि रोख शिष्यवृत्ती देणे, मार्गदर्शक पाठवून वेगवेगळ्या संघांची स्थापना करणे वा संघउभारणीस मदत करणे (उदा. आर्य क्रीडोद्धारक संघ, सरस्वती कन्या संघ इ.), पंच तयार करून आवश्यक त्या ठिकाणी त्यांना पाठविणे, लेखनसाहित्याची निर्मिती करणे, सीडी प्रकाशित करणे यासह संघाच्या वतीने दर ४ वर्षांनंतर अखिल भारतीय निमंत्रित खो-खो स्पर्धेचे आयोजन केले जाते, असे अनेक उपक्रम पार पाडले आहेत.

खो-खो जगतात नव महाराष्ट्र संघाच्या स्पर्धांचे नेहमीच सर्वांना आकर्षण वाटते, ते अनेक कारणांमुळे. प्रत्येक स्पर्धा अधिकाधिक उंची गाठणारी, दिमाखदार, नियोजनातील नेमकेपणा, नावीन्य, खेळाडू, मार्गदर्शक व पदाधिकारी यांना उत्तमोत्तम सुविधा देणारी म्हणून सर्वांनाच परिचित आहे.

संघाचा ५० वर्षांचा इतिहास मांडायचा झाल्यास त्यामध्ये अनुक्रमे कै. पाटणकर सर, मोडक सर, सुरेश दिनकर, कै. सुनील तांबे, डॉ. मधुसूदन झंवर, कै. श्याम पुरोहित, अरविंद पटवर्धन, श्रीरंग इनामदार व सचिन गोडबोले या नवरत्नांपैकी प्रत्येकाचा उल्लेख केल्याशिवाय हा इतिहास अपुराच राहील, असे वाटते.

या सर्वांचेच संघासाठी असलेले योगदान अमूल्य असेच आहे; परंतु त्याहीमध्ये सर्वाधिक कालावधी, मैदान व मैदानाबाहेर संख्यात्मक व गुणात्मक अशी चतुरस्र कामगिरी व संघटनात्मक प्रगती यांचा साकल्याने विचार करायचा झाल्यास या नवरत्नांचे प्रधानपद श्रीरंग इनामदार यांनाच द्यावे लागेल.

आजपर्यंतच्या यशाचा, गौरवगाथेचा सार्थ अभिमान आहेच; परंतु या खेळाला लोकाश्रय मिळाला, तसा राजाश्रय नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता नाही आणि परदेशी खेळांसारखी लोकप्रियता भारतीय देशी खेळांना, स्वातंत्र्य मिळून ६० वर्षे झाली तरी नाही, ही वस्तुस्थिती मनाला अस्वस्थ करते. आशा करू या, की आज ना उद्या ही परिस्थिती बदलेल.

**- सी. व्ही. कवठेकर**